# मुंबई विद्यापीठ

क्र.घ.म./ १४ /२०१४—२०१५

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय कायम विना—अनुदानित, अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, नृत्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, विना—अनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार निश्चित करुन पदे मंजूर करणे व रिक्त पदे भरणेबाबत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांचे पत्र क्र.युएनआय/बैठक/ नाव/विशि—१/४८०३ दिनांक ६ जून, २०१४ अन्वये आदेशित केले आहे. सोबत पत्राची प्रत जोडली आहे.

सदर आदेशानुसार, यापुढे विना—अनुदानित महाविद्यालयांनी सहसंचालकाकडून कार्यभार निश्चित करुन पदे मंजूर करुन घ्यावयाची आहेत. त्यानुसार सर्व कायम विना—अनुदानित महाविद्यालयांनी तात्काळ आपल्या स्तरावर कार्यवाही करावी. तसेच, कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यभार निश्चित करण्याबाबत टाळाटाळ करतील अशा महाविद्यालयांवर विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार कडक कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— १४ ऑगस्ट, २०१४

14/8/14

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय कायम विना—अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, नृत्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. डॉ. प्र. रा. गायकवाड, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे—४११ ००१.
२. मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
३. मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड — ४१० २०६.
४. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
५. स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ३२.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).
९. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), कलिना, सांताक्रुझ, मुंबई—९८.

14/8/14.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ